राष्ट्रीय / आंतराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त उत्कृष्ट मराठी चित्रपट तसेच राष्ट्रीय / आंतराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त महिला दिग्दर्शिका आणि राज्याच्या चित्रपट अनुदान योजने अंतर्गत पात्र ठरलेल्या “अ” दर्जा प्राप्त मराठी चित्रपटाच्या महिला दिग्दर्शक यांना विशेष पुरस्कार प्रदान करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक: मचिअ-२०२४/प्र.क्र.८९/सां.का.१.**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २५ सप्टेंबर, २०२४.

**वाचा :** १) शासन निर्णय, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्र. मचिअ-२०१२/प्र.क्र.१४१/सां.का.१, दि.३० ऑक्टोबर, २०१३
२) शासन शुध्दीपत्रक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्रमांकमचिअ-२०१२/प्र.क्र.१४१/सां.का.१, दि.२८ ऑगस्ट, २०१४
३) शासन शुध्दीपत्रक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, क्रमांकमचिअ-२०१२/प्र.क्र.१४१/सां.का.१, दि.०८ ऑगस्ट, २०१८
४) मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांच्या अध्यक्षतेखाली दि.०४.०९.२०२४ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

**प्रस्तावना:**

दर्जेदार मराठी चित्रपट निर्मितीसाठी प्रोत्साहन देण्याकरीता अर्थसहाय्य करण्यासाठी उपर्निर्दिष्ट १ अन्वये योजना निश्चित करण्यात आलेली आहे. आता, सदर योजनेंतर्गत राष्ट्रीय / आंतराराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त चित्रपटांच्या अनुदान रकमेत वाढ व सुधारणा करणे तसेच राष्ट्रीय / आंतराराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त महिला दिग्दर्शिकेस आणि राज्याच्या अनुदानासाठी पात्र ठरलेल्या चित्रपटाची महिला दिग्दर्शिका यांना सन्माननीय बाब म्हणून पुरस्कार प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

शासनाने निश्चित केलेल्या महोत्सवात “उत्कृष्ट मराठी चित्रपट” हा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त चित्रपट आणि दि.३० ऑक्टोबर, २०१३ च्या शासन निर्णयातील परिशिष्ट “ई” मधील नमूद आंतराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये पुरस्कार प्राप्त झालेले मराठी चित्रपट यांना देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करणे, तसेच राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय चित्रपट पुरस्कार प्राप्त मराठी चित्रपटाची महिला दिग्दर्शिका तसेच राज्याच्या अनुदानासाठी पात्र ठरलेल्या “अ” दर्जा प्राप्त चित्रपटाची महिला दिग्दर्शिका यांना देण्यात येणाऱ्या अनुदानाव्यतिरिक्त विशेष पुरस्कार खालीलप्रमाणे विशेष पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे -

| अ. क्र. | शासन निर्णय | बाब | सद्य:स्थितीतील अनुदान / पुरस्कार रक्कम (रुपये) | सुधारित रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|---|
| १. | दि ३० ऑक्टोबर, २०१३ सहपत्र परिशिष्ट “ब” | राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त उत्कृष्ट मराठी चित्रपट निर्माता / संस्था | ४०.०० लक्ष | ८०.०० लक्ष |
| २. | - | राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय महोत्सवात उत्कृष्ट चित्रपट पुरस्कार प्राप्त मराठी चित्रपटाच्या तसेच राज्याच्या चित्रपट अनुदान योजने अंतर्गत पात्र ठरलेल्या “अ” दर्जा प्राप्त मराठी चित्रपटाच्या महिला दिग्दर्शिका. | - | ५.०० लक्ष |

**०२.** सदर पुरस्कार प्रदान करण्याची अमंलबजावणी माहे जानेवारी, २०२४ नंतर परिक्षण करण्यात आलेल्या चित्रपटांना तसेच जानेवारी, २०२४ नंतर राष्ट्रीय / आंतराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त मराठी चित्रपट निर्माता / संस्था व राष्ट्रीय / आंतराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त मराठी चित्रपट महिला दिग्दर्शकांना लागू राहिल.

**०३.** यासाठी होणारा खर्च "मागणी क्र.झेडडी-२, २२०५ कला व संस्कृती कार्यक्रम (००) १०२, कला संस्कृती प्रचालन (०३) (०७) मराठी चित्रपट निर्मितीसाठी सहायक अनुदान (२२०५ १५९९) ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशीर्षाखाली त्या-त्या अर्थसंकल्पीय वर्षात प्राप्त झालेल्या निधीमधूनभागविण्यात यावा.

**०४.** सदर योजना महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०० ०६५ यांच्यामार्फत राबविली जाईल.

**०५.** उपनिर्दिष्ट १ ते ३ मधील शासन निर्णयातील अटी व शर्ती या शासन निर्णयास लागू राहतील.

**०६.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२४०९२५१२४४२४३६२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ANIROODHA
SURYAKANT
DESHPANDE

Digitally signed by ANIROODHA SURYAKANT DESHPANDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=TOURISM AND CULTURAL AFFAIRS DEPARTMENT, 2.5.4.20=d34fa92fd12dd57b9647dbd172129b5c0eb8b1cd7ff442b98831311214458302, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=0D09B1312327B281B742D56CD04EE1899269D4FAAF88991AC3364BDCC437CF37, cn=ANIROODHA SURYAKANT DESHPANDE
Date: 2024.09.25 16:09:12 +05'30'

**(अ. सू. देशपांडे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मंत्री (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. अपर मुख्य सचिव, सांस्कृतिक कार्य यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, दादासाहेब फाळके चित्रनगरी, गोरेगाव, मुंबई.
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
५. महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
८. नियोजन विभाग (का.१४४३), मंत्रालय, मुंबई.
९. वित्त विभाग (व्यय-१५, अर्थसंकल्प)मंत्रालय, मुंबई.
१०. अवर सचिव (रोख शाखा), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. निवडनस्ती.